## प्रेसनोट

दिनांक ०३/०३/२०२२

**“ सामाजिक सुरक्षा विभाग यांचे पथकाने अवैधरित्या बंदिस्त जागेत जुगार खेळणाऱ्या तसेच विदेशी दारुच्या व बियरच्या बाटल्याची साठवुणक करुन विक्री करीता विनापरवाना वाहतूक करणाऱ्या इसमांवर कारवाई केलेबाबत ”**

मा. पोलीस आयुक्त श्री. कृष्ण प्रकाश, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय यांनी पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीमध्ये अवैध धंद्यावर प्रतिबंध करण्याच्या अनुषंगाने माहिती काढुन कारवाई करणेबाबत आदेश दिल्याने सामाजिक सुरक्षा पथक हे पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीमध्ये अवैध धंद्यावर कारवाई करण्याच्या अनुषंगाने गोपनिय माहिती काढत असताना दिनांक ०२/०३/२०२२ रोजी चिखली पोलीस स्टेशन हद्दीत बंदिस्त जागेत स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी पैशावर जुगार खेळणाऱ्या व देहूरोड पोलीस स्टेशन हद्दीत विनापरवाना अवैधरित्या वाहनातून विदेशी दारुच्या व बियरच्या बाटल्याची साठवणुक करुन वाहतूक करणाऱ्या इसमांवर कारवाई करण्यात आली आहे.

दिनांक ०२/०३/२०२२ रोजी सामाजिक सुरक्षा विभागाचे पथकातील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी चिखली पोलीस स्टेशन हद्दीत राधास्वामी सत्संग ब्यास लगत, नेवाळे वस्ती, चिखली, पुणे येथे स्वप्निल मळेकर हा त्यांच्या बंदिस्त असलेल्या जनावरांच्या गोठ्यामध्ये लोकांना जमवुन तीन पत्ती नावाचा जुगार पैसे लावुन स्वतः खेळत व लोकांना खेळवित आहेत. अशी गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या गोपनिय माहितीवरुन सामाजिक सुरक्षा विभागाचे पथकातील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी चिखली पोलीस स्टेशन हद्दीत दुपारी १४:४५ वाजता सापळा रचुन छापा टाकुन खालील मुद्देमाल आरोपीच्या ताब्यात मिळुन आला त्याचे वर्णन खालील प्रमाणे आहे.

१) ३८,०६०/- रु रोख रक्कम.
२) ४०/- रु किं चे तीन पत्ती जुगार खेळण्यासाठी वापरलेले सुट्टे पत्ते.
-------------------------------------

**असा एकुण ३८,१००/- रु किं चा मुद्देमाल** मिळुन आला म्हणुन इसम नामे १) स्वप्निल सुदाम मळेकर वय ३० वर्षे रा. नेवाळे वस्ती, चिखली, पुणे (जुगार चालक-मालक) २) किरण विष्णु नेवाळे वय ४० वर्षे रा. नेवाळे वस्ती, चिखली, पुणे (जुगार खेळी) ३) विजय नामदेव नेवाळे वय ५० वर्षे रा. नेवाळे वस्ती, चिखली, पुणे (जुगार खेळी) ४) सतिश बाजीराव नेवाळे वय २८ वर्षे रा. नेवाळे वस्ती, चिखली, पुणे (जुगार खेळी) ५) अजय अनिल बिडकर वय ३० वर्षे रा. नेवाळे वस्ती, चिखली, पुणे (जुगार खेळी) ६) किशोर भानुदास कदम वय २९ वर्षे रा. नेवाळे वस्ती, चिखली, पुणे (जुगार खेळी) ७) सागर अशोक पाटील वय ३० वर्षे रा. नेवाळे वस्ती, चिखली, पुणे (जुगार खेळी) यांचेविरुध्द चिखली पोलीस स्टेशन येथे गुरनं १००/२०२२ महाराष्ट्र जुगार अधिनियम १८८७ चे कलम ४,५ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला असुन पुढील तपास चिखली पोलीस स्टेशन करीत आहे.

तसेच दिनांक ०२/०३/२०२२ रोजी सामाजिक सुरक्षा विभागाचे दुसऱ्या पथकातील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी देहूरोड पोलीस स्टेशन हद्दीत एक इसम हा त्याची मारुती सुझुकी कंपनीची सेलेरीओ कार तीचा आरटीओ नं- एमएच १४ एचडी २९९७ हिचेमध्ये विनापरवाना अवैधरित्या मोठ्या प्रमाणात दारु साठा साठवणुक करुन त्याची मामुर्डी परिसरात वाहतूक करुन स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी विक्री करीत आहेत. अशी

गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या गोपनिय माहितीवरुन सामाजिक सुरक्षा विभागाचे पथकातील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी देहूरोड पोलीस स्टेशन हद्दीत दुपारी १४:१५ वा चे सुमारास सापळा रचुन छापा टाकुन आरोपीच्या ताब्यातुन खालील मुद्देमाल जप्त केला त्याचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

१) १८,८२०/- रु किं च्या विदेशी दारुच्या व बियरच्या बाटल्या
२) ५,१०,०००/- रु किं ची सेलेरिओ कार जु.वा.कि.अं.

-----------------------------

**असा एकुण ५,२८,८२०/- रु किं चा मुद्देमाल** मिळुन आला म्हणुन इसम नामे १) दिनेश बबन बोडके वय ३२ वर्षे रा. मु.पो. शिवणे ता. मावळ जि. पुणे **तसेच पाहिजे आरोपी नामे** २) सचिन वाईन्स देहूरोड, पुणे चा चालक-मालक पुर्ण नांव पत्ता माहित नाही यांनी त्यांचे वाईन्स शॉपमधुन अनुज्ञप्तीचे उल्लंघन करुन मोठ्या प्रमाणात नियमापेक्षा अधिक दारु यातील आरोपी क्रमांक ०१ यांना विक्री केली म्हणुन त्यांचेविरुध्द देहूरोड पोलीस स्टेशन येथे गुरनं ११९/२०२२ महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५(अ)(ई),८२,८३ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला असुन पुढील तपास देहूरोड पोलीस स्टेशन करीत आहे.

**वरील दोन्ही कारवाईमध्ये एकुण ५,६६,९२०/- रु किं चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

सदरची कामगिरी मा. पोलीस आयुक्त श्री. कृष्ण प्रकाश, मा. अपर पोलीस आयुक्त, श्री. डॉ. संजय शिंदे, मा. पोलीस उप-आयुक्त, (गुन्हे) श्री. डॉ. काकासाहेब डोळे, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त डॉ. श्री. प्रशांत अमृतकर, वपोनि श्री. देवेंद्र चव्हाण यांचे मार्गदर्शनाखाली सामाजिक सुरक्षा विभागातील सपोनि डॉ. अशोक डोंगरे, पोउपनि प्रदिपसिंग सिसोदे, पोउपनि श्री. धैर्यशिल सोळंके पोलीस अंमलदार विजय कांबळे, संतोष बर्गे, नितीन लोंढे, किशोर पढेर, गणेश कारोटे, मारुती करचुंडे, अमोल साडेकर, वैष्णवी गावडे, संगिता जाधव, सोनाली माने, अमोल शिंदे, सुमित डमाळ यांनी केली आहे.


MH 14 HD 2997
Budweise
MAGNUM
Budweise
MAGNUM
TUBORG
OPEN
FOR
FUN
Mar 02, 2022, 14:44